**फौजदारी प्रकिंया संहितेचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराची साक्ष**

**नि.फौ.ख.क्र.८७९/२०१५**
**सरकार वि. हंसराज**
**निशाणी क्र.०५**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — निलकंठ पाडुरंग गिरडकर
वय — ६२ वर्ष धंदा — सेवानिवृत्त
पत्ता — शिवनगर, कन्हान, ता. पारशिवणी, जि. नागपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एम.एम.पंचारीया यांच्यातर्फे</u>**

०१. दिनांक १६.०२.२०१५ रोजी पोलीसांनी मला तुलाराम यादव यांच्या शेताजवळ जुनी कामठी रेती घाटात पंचनाम्यासाठी बोलविले होते. पोलीसांनी मला सांगितले होते की त्यांनी रेतीचे ट्रक पकडलेले आहेत व त्या ट्रकचे पंचनामे करायचे आहेत. त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. पोलीसांनी माझे समक्ष दोन ट्रक अंदाजे प्रत्येकी चार ब्रास रेतीसह जप्त करून घटनास्थळ व जप्ती पंचनामे तयार केले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.०६</u>** देण्यात येते. आता मला दोन जप्ती पंचनामे दाखविले. त्यानुसार पोलीसांनी ट्रक क्र. एमएच ४० एन ०१८५ व एमएच ४० एके १००८ असे दोन ट्रक अंदाजे प्रत्येकी चार ब्रास रेतीसह जप्त केले होते. त्या पंचनाम्यांवर माझ्या सह्या आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.०७ व ०८** देण्यात येते. त्यानंतर पोलीस ते दोन्ही ट्रक घेवून पोलीस स्टेशनला गेले. एका आरोपीचे नाव धनकर होते. दुस–याचे नाव मला आठवत नाही कारण पुष्कळ दिवस झाले आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो.

**प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी फरारी असल्यामुळे आरोपीच्या अनुपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे, आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.12.04 16:54:46 +0530

ठिकाण —कामठी (रा.र.शेरेकर)

दिनांक —०४/१२/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.२, कामठी.